# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे

अंक १२ वा

६ नोव्हेंबर १९९५

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे


## पराजयाचा विजयोत्सव

शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी गेल्या विधानसभा निवडणुकीत बिलोली व हिंगणघाट मतदार संघातून उभे होते. दोन्ही मतदार संघात पराभूत झाले असले तरी आपल्या पूर्ण गैरहजेरीत ज्या कार्यकर्त्यांनी प्रचार कार्य केले, आपल्या गैरहजेरीचा बाऊ न करता ज्या शेतकरी भावाबहिणींनी आणि स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांनी आपल्याला मते दिली त्यांना मतदारसंघात जाऊन एकवार भेटावे अशी तळमळ त्यांना लागली होती. पण, डॉक्टरांनी दौरे, भाषणे यांना मनाई केल्यामुळे त्यांना त्यांची इच्छा दाबून ठेवावी लागली.

पण ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात मराठवाड्याच्या बऱ्याच भागात प्रचंड पाऊस पडला, नद्यांना महापूर आले. बिलोली मतदार संघातील अनेक गावे पाचेक दिवस गोदावरीच्या पाण्याने आणि ते ओसरल्यावर चिखलाने वेढून गेली होती. हाताशी आलेली पिके हातची गेली, नवीन पेरण्याही फुकट गेल्या, पिण्याच्या पाण्याचे हाल सुरू झाले.

शरद जोशींना स्वस्थ बसणे अशक्य झाले आणि त्यांनी कळवून टाकले की मी माझ्या या संकटग्रस्त कार्यकर्त्यांना व मतदार भावाबहिणींना भेटायला येत आहे. मतदार संघाचा विस्तार मोठा. त्यामुळे नरसी, देगलूर आणि कुंडलवाडी अशा तीन ठिकाणी भेटीचा कार्यक्रम ठरला. २९ ऑक्टोबरला आंबेठाणहून निघून ३० तारखेला सकाळी ८ वाजता नांदेडला शरद जोशींसह पोहोचलो. पहिली सभा नरसी येथे दुपारी १ वाजताची ठरलेली. दुसरी सायंकाळी ४ वाजता देगलूर येथे आणि शेवटची कुंडलवाडी येथे रात्री ८ वाजता. सभांना लोक किती जमतील याची चिंता नव्हती, शरद जोशींनी चिंता होती पडेल उमेदवाराने मतदारांचे आभार मानतांना काय भाषण करायचे?

शेवटी पहिल्या सभेची वेळ येऊन ठेपली आणि आम्ही गाडीत जाऊन बसलो. नरसीच्या आधी २ किलो मिटरवर स्वागताची कमान! वरची मुद्राही संघटनेची आणि स्वागतही शरद जोशींचंच. नरसीला पोहोचताच लक्षात आले की या 'पडेल' उमेदवाराच्या स्वागतासाठी लोक हजारोंनी जमले होते, उत्साहाने जमले होते, आपल्या उमेदवाराच्या पराभावाने आली म्हणावी अशी निराशेची रेषाही चेहऱ्यावर कुठे नव्हती, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीने केलेल्या हानीमुळे खचलेपणाही कुठे चेहऱ्यावर नव्हता. जमलेल्या हजारो शेतकरी स्त्रीपुरुषांच्या चेहऱ्यावर दिसत होता आपल्या नेत्याला धडधाकट पाहाण्यातला आनंद आणि आता या नेत्याने काही तरी आदेश द्यावे, आपण ते प्राणपणाने पाळावे असा आत्मविश्वासपूर्ण आवेश.

पुढच्या दोनही गावांतील सभासमयीचं वातावरण याच जातीचं आणि चढत्या श्रेणीचं. वाजंत्री होती, फटाके होते, पताकांची सजावट होती आणि कुंडलवाडीकरांनी तर रात्रीच्या वेळेचा फायदा घेऊन सुरेख रोषणाईही केली होती.

स्थानिक कार्यकर्त्यांच्या भाषणांत अतिवृष्टीमुळे तयार झालेल्या परिस्थितीबद्दल तक्रार नव्हती, पराभवाबद्दल खेद नव्हता, काळजी होती शरद जोशींच्या तब्येतीची, आनंद होता त्यांच्या तब्येतीतील सुधारणेचा आणि मागणी होती लढाईच्या कार्यक्रमाची.

तीनही ठिकाणी शरद जोशींनी अगदी मन खोलून आपल्या बहिणभावांशी संवाद साधला आणि त्यांची मनं सुखावून टाकली. इंडियन राजकारणात पडेल उमेदवाराला कुत्रंसुद्धा विचारीत नाही अशी वस्तुस्थिती असतांना, आपण पराभूत उमेदवार असूनही आपल्या झालेल्या स्वागताचा उल्लेख करून ते आपल्या भाषणांतून म्हणाले, "पराभूत झाल्यावर इतकं स्वागत, प्रेमभरं स्वागत होत असेल तर मी कायम पराभूत होणंच पसंत करेन."

या दौऱ्यात शरद जोशींसमवेत अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे, माजी अध्यक्ष श्री. पाशा पटेल व श्री. किशोर माथनकर, नांदेड जिल्हा प्रमुख श्री. गुणवंत पाटील हंगर्गेकर व नांदेड जिल्ह्यातील श्री. माधवराव पाटील शेळगांवकर, श्री. नेरलकर गुरुजी आदि प्रमुख कार्यकर्ते तसेच शेतकरी महिला आघाडीच्या सौ. मीनाताई कांगठीकर हे होते.

– सुरेशचंद्र म्हात्रे

*(या तीनही सभांतील शरद जोशींनी केलेल्या भाषणांचे एकत्रित संकलन पुढील अंकात प्रकाशित करण्यात येईल.)*

**१० नोव्हेंबर : शेतकरी हुतात्मा स्मरण दिन**

**सर्व शेतकरी हुतात्म्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.**

कार्यकारिणी

नागपूर १ नोव्हेंबर १९९५

# ठराव

**ठराव १ : आर्थिक सुधार**

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत (नागपूर, १ नोव्हेंबर १९९५)

महाराष्ट्रातील पीकपाण्याचा आढावा घेण्यात आला, देशाच्या व महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला,

तसेच, लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर देशातील व राज्यातील राजकीय परिस्थिती काय आहे याचाही आढावा घेण्यात आला.

देशातील आर्थिक सुधारांच्या अंमलबजावणीची गती केवळ मंदावली आहे एवढेच नसून अंमलबजावणी उलट्या गतीने सुरू झाली आहे याबद्दल ही बैठक चिंता व्यक्त करीत आहे.

**ठराव २ : ऊस परिस्थिती**

शेतकरी संघटनेची कार्यकारिणी (नागपूर, १ नोव्हेंबर १९९५)

जुन्या काँग्रेसी शासनाने उसाच्या झोनबंदीचा कायदा केला, जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या सैतानी स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयालाही झोनबंदीच्या या कायद्यावर शिक्कामोर्तब करणे भाग पडले याबद्दल चिंता व्यक्त करते; आणि

युती सरकारला विनंती करते की त्यांनी, जुन्या काँग्रेसी शासनाने केलेल्या या अन्याय्य कायद्याचा फेरविचार करावा;

काही कारखान्यांना त्यांच्या सध्याच्या डबघाईच्या परिस्थितीमुळे उसाला दोनअडीचशे रुपयेसुद्धा भाव देणे शक्य नाही तरीही या कायद्यामुळे कारखाना क्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांनाच ऊस देणे भाग पाडले जात आहे याचा तीव्रतेने निषेध करते, आणि

ठराव करते की,

हे कारखाने म्हणजे शेतकऱ्यांची थडगी आहेत, ते चालू ठेवण्यात शेतकऱ्यांना स्वारस्य असण्याचे काहीच कारण नाही ही भूमिका पुढे मांडण्यासाठी आणि शेतकऱ्यांना भारभूत ठरलेली ही कारखानदारी मोडून काढण्यासाठी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्यावर महाराष्ट्रभरचे शेतकरी १५ नोव्हेंबर १९९५ रोजी 'हातोडी मोर्चा' घेऊन जातील.

**ठराव ३ :**

**कृषिउत्पन्न बाजार समिती : खरेदी कर**

शेतकरी संघटना कार्यकारिणी (नागपूर, १ नोव्हेंबर १९९५)

कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या शेतीमालावरील मार्केट कमिटी सेस (खरेदी कर) व्यापाऱ्यांकडूनच वसूल केला जावा अशी घोषणा महाराष्ट्र शासनाने करताच त्याविरुद्ध महाराष्ट्रभरातील सर्व व्यापारी व अडत्यांनी उभ्या केलेल्या संघर्षाची व आंदोलनांची नोंद घेऊन,

इतर सर्व करांप्रमाणेच या खरेदीकराचा बोजा अखेरी शेतकऱ्यावरच पडतो, त्यामुळे याविषयी सुरू झालेले वादंग निरर्थक आहेत, तसेच सरकारच्या या निर्णयाने शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे असे जे अकांडतांडव केले जात आहे तेही निरर्थक आहे आणि तरीसुद्धा, सरकारची घोषणा झाल्यानंतर सरकारशी किंवा शेतकऱ्यांची / त्यांच्या प्रतिनिधी संघटनांशी विचारविनिमय न करता, एरवी सर्व अन्याय सहन करणारे व्यापारी / अडते एकदम आंदोलनात उतरले याचा निषेध करते;

विशेषतः फळे व भाजीपाल्यासारख्या नाशिवंत शेतीमालांचे या आंदोलनामुळे मोठे नुकसान होणार आहे याबद्दल चिंता व्यक्त करते;

आणि आंदोलनकर्त्या व्यापाऱ्यांना विनंती करते की त्यांनी आपला संघर्ष मागे घ्यावा आणि सरकार व शेतकरी यांच्याशी चर्चा करण्यास तयार व्हावे;

आणि ठराव करते की,

ज्या कृषिउत्पन्न बाजार समित्यांमध्ये व्यापारी

शेतीमालाची खरेदी थांबतील तेथे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते बाजार चालू ठेवतील आणि शेतकरी, ग्राहक व किरकोळ विक्रेते यांना तशा सूचना देऊन शेतीमालाची उलाढाल सुरू ठेवतील. आणि व्यापारी / अडत्यांच्या मध्यस्थीशिवायही उत्पादक व ग्राहक यांचा थेट संपर्क, तोही दोघांनाही लाभकारक, साधणे सहज शक्य आहे याची प्रचिती देतील.

**ठराव ४ : कापूस एकाधिकार खरेदी**

शेतकरी संघटना कार्यकारिणी (नागपूर, १ नोव्हेंबर १९९५)

महाराष्ट्रातील एकाधिकार कापूस खरेदी योजनेला पुन्हा एकदा मुदतवाढ मिळाली याबद्दल दुःख व्यक्त करते;

युती सरकारने कापसाला १६५० रुपये भाव व शेवटपर्यंत, बोनस मिळून किमान २१०० रुपये मिळतील असे जाहिर केले याबद्दल युती सरकारचे अभिनंदन करते;

ही मुदतवाढ राज्य शासनाच्या मागणीने मिळाली नसून ती महाराष्ट्रातील सत्ताभ्रष्ट काँग्रेस पुढाऱ्यांचे शिष्ठमंडळ व केंद्रातील भ्रष्ट मंत्री यांच्या ओंगळ हातमिळवणीतून मिळाली याचा विशेष निषेध करते;

कापसाच्या प्रश्नावर काँग्रेसने जो ढोंगीपणा सुरू केला आहे त्याचा निषेध करते. एकाधिकार खरेदी योजनेतील हमी भाव आधारभूत किंमतीपेक्षा २० टक्क्यांनी जास्त असावा अशी मागणी शेतकरी संघटना १९८६ पासून करीत होती तिला काँग्रेसने विरोध केला, या मागणीसाठी केलेली आंदोलने पोलिसी बळाने दडपली, तीन शेतकऱ्यांचे बळी घेतले त्यावेळी सत्तेत असलेलेच पुढारी आता सत्ताभ्रष्ट झाल्यानंतर कापसाच्या हमी भावाचे आंदोलन छेडतात या त्यांच्या ढोंगीपणाबद्दल त्यांचा निषेध करते;

शेतकरी संघटनेच्या, एकाधिकार खरेदीबद्दलच्या भूमिकेचा पुनरूच्चार करते. शेतकरी संघटनेचा सरकारी खरेदीला विरोध नाही, प्रामाणिकपणे खरेदी करण्याची सरकारची तयारी असेल तर शेतकरी संघटना सहकार्य करील, पण खरेदीतील एकाधिकाराला संघटनेचा विरोध आहे. युती सरकारने जाहिर केलेली २१०० रुपयांची किंमत खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा कमी आहे. पण, एकाधिकार खरेदी योजनेच्या आजच्या अवस्थेत खुल्या बाजारापेक्षा अधिक किंमत देणे शक्य नाही. कारण, ज्यांनी आतापर्यंत ही योजना चालवली आणि आता जे सत्ताभ्रष्ट झाले आहेत त्यांच्यामुळे भ्रष्टाचार, भरमसाठ नोकरभरती, विक्रीव्यवस्थेतील गोंधळ, रुई करण्याबाबतीत कमालीची अकार्यक्षमता इत्यादी दोष या योजनेत बोकाळले आहेत, ते दूर केल्याखेरीज बाजारभाव मिळणे शक्य नाही. नव्या शासनाला, जुन्या शासनाने केलेली घाण दूर करता यावी यासाठी, संघटनेचा एकाधिकाराला असलेला तात्त्विक विरोध कायम ठेवून, ही कार्यकारिणी एक वर्षाची संधी देते;

आणि ठराव करते की,

एकाधिकार खरेदीला तात्त्विक विरोध नोंदविण्यासाठी महाराष्ट्रभरच्या शेतकऱ्यांच्या दोन स्वातंत्र्ययात्रा, एक नांदेडहून व दुसरी नागपूरहून निघून १२ डिसेंबर १९९५ म्हणजे हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मृतिदिनी महाराष्ट्र व मध्यप्रदेशाच्या सीमेवरील पांढुर्णा या गावी एकत्रित होतील. या स्वातंत्र्ययात्रेत कापसाचे शेतकरी एक पिशवी भरून कापूस आपल्या सोबत आणतील आणि सर्व शेतकरी मिळून कापूस सीमापार करून त्याची विक्री करतील.

# आदेश.... आदेश.... आदेश....

नागपूर येथे १ नोव्हेंबर १९९५ या दिवशी झालेली शेतकरी संघटना कार्यकारिणीची बैठक शेतकरी संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांना आदेश देते की,

कृषिउत्पन्न बाजार समितीतील व्यापारी / अडते यांनी शेतीमालाच्या खरेदीचे काम खरेदीकराच्या वसुलीसंबंधी सरकारी घोषणेमुळे थांबविले तर त्यांनी मार्केट कमिटीचा ताबा घेऊन शेतीमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार चालूच ठेवावे. त्यासाठी आवश्यक त्या मार्गाने प्रचार करून उत्पादक शेतकरी, ग्राहक व किरकोळ व्यापारी यांच्यापर्यंत व्यवहार चालू राहाण्यासंबंधीची ही योजना कळवावी.

# जनावरांचे शिवार

**जॉर्ज ऑरवेल यांच्या Animal Farm चे भाषांतर : श्री. रमेश मुधोळकर (१९८५)**

### पूर्वसूत्र

**स्वराज्याची सुराज्यात उभारणी करण्यात सगळे प्राणी गर्क होते. प्राणी कृषिसंस्थेचा सर्वत्र बोलबाला होता. त्याचबरोबर, हकालपट्टीने दुखावलेला जोन्स आणि त्याची मित्रमंडळी प्राणिकृषिसंस्थेची बदनामी करण्याचा प्रयत्न करीत होती. पण, प्राण्यांची प्रगती निष्ठेने चालूच होती. अशात, अचानक माणसांनी प्राणि कृषि संस्थेवर हल्ला केला. पण असा हल्ला होण्याची खात्री असल्याने स्नोबॉलच्या नेतृत्वाखाली प्राणिसेनेची रचना आधीच केलेली होती. या प्राणिसेनेने आपल्या विविध डावपेचांनी माणसांचा दारूण पराभव केला. या लढाईतील शौर्याबद्दल स्नोबॉल व बॉक्सर यांना 'पशुनायक-प्रथमश्रेणी' म्हणून गौरव करण्यात येऊन (जोन्सच्या सामानाच्या खोलीत सापडलेल्या, घोड्याच्या अंगावर घालायच्या) पितळी चकत्या पदक म्हणून देण्यात आल्या. लढाईत स्नोबॉलने चुकवलेल्या बंदुकीच्या गोळीला (अनवधानाने) बळी पडलेल्या मेंढ्याला 'पशुनायक-द्वितीय श्रेणी' हा किताब मरणोत्तर बहाल करण्यात आला. या 'गोठ्याच्या लढाई'तील विजयाने प्राण्यांची हिम्मत आणखी वाढली.**

## ५. पवनचक्कीचे राजकारण

हिवाळ्यात थंडी जसजशी वाढू लागली, तसतसा मॉलीचा उपद्रव वाढू लागला. रोज सकाळी ती उशिरा कामावर येई आणि 'मला आज उशीर झाला,' 'मी आजारी आहे' अशा सबबी सांगे. पण तिचे खाणेपिणे पूर्वीसारखेच भरपूर असे. काहीतरी निमित्त सांगून ती कामाच्या ठिकाणापासून दूर पळ काढी. लहानग्या तळ्याकडे जाई आणि तिथे पाण्यात आलेच प्रतिबिंब पहात उभी राही. आताश्या तर तिच्यासंबंधी फार गंभीर स्वरूपाच्या अफवा पसरल्या होत्या.

एके दिवशी मॉली आपली लांबसडक भरदार शेपटी नाचवीत, गवत चघळीत मजेत चालली होती. तेवढ्यात क्लोवरने तिला हाक मारली. 'मॉली! मला आज तुझ्याशी एका गंभीर विषयावर बोलायचे आहे. कुंपणानजीक आपल्या शेतीवाडीच्या पलीकडे पिलकिंग्टनच्या शेताकडे तू पहात उभी होतीस असे सकाळी मला दिसले. पिलकिंग्टनचा एक नोकर कुंपणाच्या पलीकडे उभा होता. तो नोकर तुझ्याशी बोलत होता. तुझे नाक थोपटत होता. या सगळ्या गोष्टींचा अर्थ काय?'

'मुळीच नाही! तो तिथे नव्हता! मी तिथे नव्हते! आणि हे सगळे खोटे आहे!' जागच्या जागी मागच्या पायांनी उड्या घेत मॉली खिंकाळली.

'मॉली! वर तोंड करून माझ्याकडे बघ, तो माणूस तुझे नाक थोपटत नव्हता हे तू शपथेवर सांगते?' क्लोवरने विचारले.

'हे सगळे खोटे आहे!' मॉली पुन्हा चिडून म्हणाली, पण नजर वर करून क्लोवरकडे पाहण्याचे धैर्य तिला झाले नाही. लगेच क्षणार्धात दौडत ती तिथून निघून गेली.

क्लोवरच्या डोक्यात एक विचार चमकून गेला. दुसऱ्या कुणाला काहीही न सांगता तो मॉलीच्या तबेल्याकडे गेला आणि आपल्या पायाच्या खुरांनी तिथले गवत बाजूला सारून त्या तबेल्याची झडती घेतली, तिथे त्याला काही गुळाचे खडे आणि रंगीत रिबिनी लपवलेल्या आढळल्या.

तीन दिवसानंतर मॉली अकस्मात कुठेतरी गायब झाली. कबुतरांनी तिचा शोध केला. तेव्हा गावापलीकडच्या एका वाडीत सुरेख रंगवलेल्या एका तांग्याला ती जुंपलेली त्यांना दिसली. खाणावळवाल्यासारखा दिसणारा लठ्ठ लालतोंड्या माणूस तिला गुळाचे खडे चारीत होता. तिच्या कपाळावर छान छान रिबिनी लावलेल्या होत्या. नाना प्रकारचे साज अंगावर चढवून तिला शृंगारले होते. ती खूपच खुशीत होती. कबुतरांनी आणलेल्या वार्तेनंतर कुणाही प्राण्याने मॉलीचे नाव काढले नाही.

जानेवारीत कडाक्याची थंडी पडल्याने जमीन कडक झाली. शेतात काम करणे अशक्य झाले होते. मोठ्या गोदामात अनेक मिटींग्ज घेऊन पुढच्या हंगामात काय कामे करावयाची याच्या योजना आखण्यात आल्या. डुकरांनी योजना आखावयाच्या आणि इतरांनी त्यावर बहुमताने शिक्कामोर्तब करावयाचे अशी ही व्यवस्था चांगल्याप्रकारे चालू होती. परंतु स्नोबॉल आणि नेपालियन यांच्यात वारंवार खटके उडू लागले. एकाने खूप एकरांमध्ये बार्ली पेरावी अशी सूचना केली की दुसरा त्यात सातू पेरावेत अशी भूमिका घेई. एकाने शेताच्या एखाद्या भागात कोबी लावावीत असे ठरवले की दुसरा हमखास म्हणे, 'तिथे रताळ्यांशिवाय दुसरे काहीही पिकणार नाही.' दोघांनाही अनुयायी होते. सभेत स्नोबॉल आपल्या प्रभावी वक्तृत्वाने फड मारून बहुमत आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करी, तर नेपोलियन दोन सभांच्या मधल्या कालावधीत प्रचार करून आपल्याला पाठिंबा मिळवी.

अलीकडे मेंढरांनी एक नवीनच प्रकार सुरू केला. वेळ काळ न पाहता केव्हाही 'चार पाय छान, दोन पाय वाईट!' असे बेंबाटत. त्यामुळे सभेच्या कामकाजात अडथळा उत्पन्न होई. स्नोबॉलच्या भाषणाच्या नेमक्या क्षणी ही मेंढरे 'चार पाय छान, दोन पाय वाईट' असा धोषा लावीत आणि गोंधळ करीत असत.

'पशुसंवर्धन आणि त्यांचे कृत्रिम प्रजोत्पादन' या मासिकाचे जुने अंक बंगल्यात पडून होते. त्यांचा अभ्यास करून स्नोबॉलने योजना तयार केल्या. हिरवे गवत खड्ड्यात पुरून ताजे कसे ठेवावे, उत्पादन कसे वाढवावे अशा विषयांवर तो विद्वत्ताप्रचुर भाषणे करी. जनावरांनी इकडे तिकडे विष्ठा टाकू नये, कोणत्या प्राण्याने कुठे विष्ठा टाकावी याबाबत त्याने योजना केली. नेपोलियन स्वतः योजना तयार करीत नव्हताच, पण स्नोबॉलच्या योजनेतून काहीही निष्पन्न होणार नाही असे तो शांतपणे सांगत असे. यातूनच चकमकी उडत. पवनचक्कीच्या योजनेवरून झालेली वादावादी तर फारच भयंकर स्वरूपाची होती.

मोठ्या कुरणात बंगल्याच्या पलीकडे एक टेकाड होते. स्नोबॉलने या जागेची पहाणी करून ही जागा पवनचक्कीसाठी उत्तम आहे असा निष्कर्ष काढला. पवनचक्कीच्या सहाय्याने शेतीवाडीत वीज निर्मिती आणि पुरवठा करता येईल असे त्याचे म्हणणे होते. एकदा वीज पुरवठा सुरू झाला की तबेल्यात, गोठ्यात, खुराड्यात विजेचे दिवे लावता येतील. हिवाळ्यात आतली हवा उबदार ठेवता येईल. कडबा व गवत कापण्याचे यंत्र विजेवर चालवता येईल. पण वीज आणि विजेवर चालणारी यंत्रे या गोष्टी इतर प्राण्यांच्या ऐकिवातही नव्हत्या. आजवर त्यांनी जुनी हत्यारेच वापरली होती.

त्यामुळे ही नवीन माहिती ऐकून ते थक्क झाले. स्नोबॉल त्यांच्यापुढे मोठी कल्पनारम्य चित्रे उभी करी. ही विलक्षण यंत्रे आणली म्हणजे आज जी कामे प्राण्यांनाच करावी लागतात ती कामे प्राण्यांऐवजी यंत्रेच उरकून टाकतील. मग प्राण्यांना खुशाल चवीने इकडेतिकडे चरता येईल किंवा वाचन आणि संभाषणाद्वारे आपली मानसिक उन्नतीही करता येईल असे तो सांगे.

जोन्सच्या बंगल्यातील 'आपल्या घरासाठी बनवावयाच्या एक हजार वस्तू', 'गवंडी काम', 'वीजविषयक प्राथमिक धडे' ही पुस्तके वाचून स्नोबॉलने पवनचक्कीची योजना बनवली. पूर्वी जिथे अंडी उबवली जात त्या शेडमध्ये स्नोबॉलने प्रयोगशाळा उघडली होती. लाकडाची एक गुळगुळीत फळी नकाशे काढण्यासाठी त्याने आणवली होती. तो एकदा त्या प्रयोगशाळेत गेला की तासन्‌तास बाहेर येत नसे.

स्नोबॉल पुस्तकांच्या पानांमध्ये दगड ठेवून पुस्तके उघडी ठेवी. पंजांच्या नख्यांमध्ये खडूचा तुकडा घट्ट धरी आणि फळीवर रेषांमागून रेषा काढीत तो इकडून तिकडे धावत राही. हळूहळू त्या नकाशामधील रेषा वाढता वाढता त्याची दातेरी चक्र, यंत्र तयार झाली. इतर प्राण्यांना त्यातले काडीइतकेही ज्ञान नव्हते. पण तो सारा प्रकार पाहून ते अत्यंत प्रभावित झाले होते. दिवसातून एकदा तरी स्नोबॉलचे नकाशे पाहण्यासाठी सर्व प्राणी त्याच्या शेडमध्ये जात. आपल्या पायांनी नकाशावरील खडूच्या रेषा पुसल्या जाऊ नयेत म्हणून कोंबड्या व बदकांची खूप तारांबळ उडे.

पण नेपोलियन मात्र या सगळ्या प्रकरणापासून सर्वस्वी अलिप्त होता. पवनचक्कीच्या योजनेला आपला पहिल्यापासून विरोध आहे असे तो सांगत होता. पण एकदा मात्र अनपेक्षितपणे तो नकाशांच्या पहाणीसाठी गेला. पाय आपटीत आपटीत नकाशाभोवती हिंडत राहिला. नकाशातील बारीकसारीक गोष्ट त्याने डोळ्यात तेल घालून पाहिली. डोळ्यांच्या कोपऱ्यातून काही वेळ नकाशाकडे तो पहात राहिला. त्यानंतर अचानक त्याने एक तंगडी वर करून नकाशावरच 'क्रिया' केली आणि तो तरातरा चालता झाला.

आता पवनचक्कीच्या प्रश्नावर शेतीवाडीतील प्राण्यांमध्ये सखोल मतभेदामुळे दोन तट पडले. स्नोबॉलला असे वाटत होते की पवनचक्कीची योजना जरी कठीण असली तरी ती एकदा घडून आल्यावर श्रमशक्तीची खूपच बचत होईल. त्यामुळे प्राण्यांना आठवड्यातून फक्त तीनच दिवस काम करावे लागेल! दुसऱ्या बाजूला नेपोलियनने वेगळीच प्रचारमोहीम सुरू केली. त्याचा युक्तिवाद असा होता की अन्नधान्याचे उत्पादन वाढवणे ही या घडीची गरज आहे. पवनचक्की उभारण्यासारख्या कामात वेळ आणि शक्ती वाया घालवली तर आपल्याला उपाशी मरणे भाग पडेल. यामुळे सर्व प्राण्यांमध्ये दोन गट निर्माण झाले. एका पक्षाची घोषणा होती, 'स्नोबॉलला मत द्या आणि फक्त तीन दिवस काम करा.' तर दुसऱ्या पक्षाची घोषणा होती, 'नेपालियनला मत द्या आणि पोटभर खा.' बेंजामिन गाढव हा एकच प्राणी असा होता की तो कोणत्याच पक्षात नव्हता. कधीकाळी अन्नाची रेलचेल होईल किंवा पवनचक्कीमुळे कमी कष्ट करावे लागतील यावर त्याचा काडीमात्रही विश्वास नव्हता.

पवनचक्कीवरील वादाव्यतिरिक्त संरक्षणविषयक समस्याही 'आ' वासून उभी होती. गोठ्याच्या लढाईत माणसाचा पराभव झाला असला तरी शेतीवाडी पुन्हा मिळविण्यासाठी आणि जोन्सला पुन्हा स्थानापन्न करण्यासाठी माणसे निकराने प्रयत्न करतील असे प्राण्यांना वाटत होतेच. असे वाटण्याचे एक कारण म्हणजे माणसांच्या पराभवाची बातमी हां हां म्हणता सर्व शेतीवाडीमध्ये पसरून जवळपासच्या शेतातले प्राणी माणसाशी अडेलतट्टूपणा करू लागले होते.

संरक्षणविषयक समस्येवरही नेपोलियन आणि स्नोबॉलचे मतभेद होतेच. नेपोलियनच्या मते बंदुका वगैरेसारख्या शस्त्रास्त्रपुरवठ्यात वाढ करून आपण स्वसंरक्षणाची तयारी ठेवली पाहिजे. तर स्नोबॉलला वाटत होते की बाहेरच्या शेतवाड्यांवर कबुतरे पाठवून बाहेरच्या प्राण्यांमध्ये बंडाचा उठाव केला पाहिजे. त्यामुळे माणसांविरुद्ध चोहोबाजूंनी उठाव झाला की आपल्या संरक्षणाची वेगळी तरतूद करण्याची गरजच राहणार नाही. सर्व प्राणी एकदा नेपोलियनचे तर एकदा स्नोबॉलचे ऐकत, पण कुणाचे बरोबर आहे याबद्दल त्यांच्यात एकमत होत नसे.

अखेर स्नोबॉलची पवनचक्कीची योजना पूर्ण झाली. त्यानंतरच्या रविवारी सभा भरवून पवनचक्कीचे काम हाती घ्यावे की न घ्यावे याविषयी मतदान होणार होते. त्यासाठी मोठ्या गोदामात सर्व प्राणी गोळा झाले.

स्नोबॉल उभा राहिला आणि पवनचक्की उभारणे कसे आवश्यक आहे. याविषयावर त्याने भाषण सुरू केले. पण मेंढरांनी वारंवार बेंबाटून घोषणांचा गजर केला आणि त्याचे भाषण बंद पाडले. त्यानंतर नेपोलियन उभा राहिला. तो म्हणाला, 'पवनचक्की वगैरे प्रकार निव्वळ मूर्खपणा आहे. कोणीही त्या बाजूने मत देऊ नये.' एवढेच बोलून तो खाली बसला. आपल्या भाषणाचा प्राण्यांवर परिणाम झाला किंवा नाही याची त्याने फिकीरच केली नाही. पुन्हा स्नोबॉल ताडकन् उभा राहिला. मेंढरांनी पुन्हा बँ बँ सुरू केली. पण स्नोबॉलने ओरडून त्यांना गप्प केले. आणि पवनचक्कीच्या बाजूने मत देण्यासाठी सर्वांना भावपूर्ण आवाहन केले. स्नोबॉलच्या प्रभावी वक्तृत्वाचा प्राण्यांवर जादूसारखा परिणाम झाला. स्नोबॉलने आपल्या भाषणात गोरगरीब प्राण्यांवरचे अतोनात परिश्रमाचे अवमानकारक ओझे काढून टाकल्यावर प्राणी-कृषि संस्थेत कसे वातावरण निर्माण होईल याचे आकर्षक चित्र रंगवले.

त्यामुळे बहुमताचे पारडे कोणत्या बाजुला झुकणार याबद्दल सर्व प्राण्यांना अंदाज आला. नेमका त्याच क्षणी नेपोलियन उभा राहिला. त्याने स्नोबॉलकडे तिरस्काराने पाहिले आणि तीव्र कर्कश्श आवाजात शीळ फुंकली. त्याच्या तोंडून प्राण्यांनी असा आवाज यापूर्वी कधीच ऐकला नव्हता.

पण नेपोलियनने शीळ घातल्याबरोबर बाहेरच्या बाजूने कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज आला. आणि काही क्षणातच नऊ धिप्पाड कुत्री झेपावत गोदामात शिरली. त्यांनी सरळ स्नोबॉलवरच चाल केली, स्नोबॉलने आपल्या जागेवरून ताडकन् उडी घेतली. त्यामुळेच वखवखलेल्या विक्राळ जबड्यांपासून त्याचा बचाव होऊ शकला. त्याने सरळ दरवाजाकडे धाव घेतली. लगेच कुत्र्यांनी त्याचा पाठलाग सुरू केला, हा प्रकार पाहून सर्व प्राण्यांची पाचावर धारण बसली. त्यांच्या तोंडातून शब्दही फुटेना.

गोदामातून ते कसेबसे बाहेर पडले. आणि हा पाठलाग पाहू लागले.

स्नोबॉल मोठ्या कुरणातून रस्त्याकडे जीव घेऊन पळत होता. डुक्कर जेवढ्या जास्तीत जास्त वेगाने पळू शकते तितक्या जास्तीत जास्त वेगाने तो धावत होता. परंतु कुत्र्यांचा वेग त्याच्यापेक्षा जास्त असल्याने त्यांनी स्नोबॉलला गाठलेच. ते त्याच्या अगदी जवळ पोहोचले आणि तेवढ्यात स्नोबॉल घसरून पडला. तो आता कुत्र्यांच्या तावडीत सापडला असेच सर्वांना वाटले. पण कुंपणाला पडलेल्या भगदाडातून स्नोबॉल चपळाईने निसटला. त्यानंतर तो कुणाला कधीच दिसला नाही.

सर्वच प्राणी भेदरलेले होते. त्यांचे डोके सुन्न झाले होते. चकार शब्द न काढता ते गोदामात परतले. तेवढ्यात ती कुत्रीही लांब लांब उड्या मारीत परत आली. ही कुत्री अकस्मात् कुठून टपकली याविषयी कोणालाच कल्पना करता येईना पण नंतर रहस्य उलगडले. नेपोलियनने कुत्र्यांची जी लहान पिल्ले जेसीकडून काढून घेतली होती आणि स्वतःच्या देखरेखीखाली वाढवली होती, तीच ही पिल्ले! ही पिल्लेच आता क्रूर लांडग्यांसारखी दिसत होती. ही कुत्री नेपोलियनभोवती शिस्तीत येऊन उभी राहिली. आणि शेपट्या हलवू लागली. पूर्वी जोन्सच्या कारकीर्दीत कुत्री जशी त्याच्यापुढे गोंडा घोळत होती त्याप्रमाणे आता नेपोलियनपुढे ही कुत्री गोंडा घोळत होती.

नेपोलियन चालू लागला तशी कुत्रीही चालू लागली. पूर्वी मेजरने ज्या व्यासपीठावरून भाषण केले त्याच व्यासपीठावरून नेपोलियनने एक तातडीची घोषणा केली, 'यापुढे रविवारच्या सभा बंद.' तो म्हणाला, 'या सर्वस्वी अनावश्यक आहेत. त्यात निष्कारण वेळ दवडला जातो. यापुढे कामकाजविषयक सर्व प्रश्नांचा निकाल लावण्यासाठी डुकरांची एक खास समिति नेमण्यात येईल. या समितीचे अध्यक्षपद माझ्याकडे असेल. या कमिटीचे कामकाज खासगीरित्या चालेल आणि घेण्यात आलेले निर्णय नंतर सव प्राण्यांना सांगितले जातील. दर रविवारी सर्व प्राणी यापुढेही जमतील. तेव्हा झेंडावंदनाचा कार्यक्रम होईल. 'देशातील पशूंनो' हे गीत म्हटले जाईल. प्रत्येकाला पुढच्या आठवड्यात करायच्या कामाचे हुकूम मिळतील. परंतु यापुढे कोणत्याही विषयावर चर्चा करणे अजिबात बंद करण्यात आले आहे.'

स्नोबॉलच्या हकालपट्टीने सर्व प्राण्यांना जबर धक्का बसला. त्यातच आणखी नेपोलियनच्या घोषणेने त्यांची भीतीने गाळणच उडाली. त्यांच्यापैकी अनेकांनी आपला निषेध नोंदवला असता पण त्यांना युक्तिवाद करण्यासाठी शब्दच सापडत नव्हते, बॉक्सरसुद्धा संत्रस्त झाला होता. पण नेमके काय होत आहे, याबद्दल त्याला स्वतःलाच कळत नव्हते. त्याने आपले कान मागे केले. जोरजोराने डोके हलवले. आपल्या डोक्यातील विचार नेमके आणि स्पष्ट करण्याचा त्याने परिश्रमाने प्रयत्न केला. पण अखेरीस काय बोलावे हे त्याला सुचलेच नाही.

परंतु, खुद्द डुकरांपैकी काही तरुण स्पष्टवक्ते निघाले. पहिल्याच ओळीत बसलेल्या या तरुण डुकरांनी निषेधाच्या घोषणा दिल्या, आणि ते एकदम बोलायला उभे राहिले. पण अचानक नेपोलियनभावेती बसलेली कुत्री आपले भीतिदायक सुळे दाखवीत गुरगुरू लागली. तसा डुकरांचा आवाज बंद पडला आणि ते चुपचाप खाली बसले. नंतर मेंढरांनी नेहमीप्रमाणे आपली 'चार पाय छान, दोन पाय वाईट' ही घोषणा देण्यास सुरुवात केली. तब्बल पंधरा मिनिटे तरी त्यांनी हा घोषणांचा गजर चालू ठेवला आणि कोणत्याही प्रकारे पुढे चर्चा करणे सर्वस्वी अशक्य केले.

त्यानंतर या नवीन व्यवस्थेविषयी सविस्तर माहिती समजावून सांगण्यासाठी स्क्वीलरला सगळीकडे पाठविण्यात आले.

स्क्वीलरने सुरुवात केली – 'कॉम्रेडस्! हे जादा जबाबदारीचे ओझे आपल्या खांद्यावर घेऊन कॉम्रेड नेपोलियनने जो त्याग केला आहे त्याबद्दल आपल्याला खूपच कौतुक वाटत असेल याची मला खात्री आहे. बंधूंनो, नेतृत्व करणे ही काही आनंदाची किंवा सुखाची बाब आहे असे नाही. उलट ते अतिशय जबाबदारीचे ओझे आहे. सर्व प्राणी समान या विचारावर नेपोलियनची असाधारण व अविचल श्रद्धा आहे. कारभार कसा चालवावा यासंबंधीचे निर्णय तुमचे तुम्हीच घेणे ही नेपोलियनच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची बाब होईल. परंतु बंधूंनो, काही वेळा तुमच्याकडून चुकीचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. तसे झाले तर आपले काय होल? या पशुकृषिसंस्थेचे काय होईल? समजा, तुम्ही स्नोबॉलच्या पवनचक्कीच्या वेडगळ कल्पनेला पाठिंबा दिला असता तर आपली काय गत झाली असती? स्नोबॉल हा एक नंबरचा गुन्हेगार होता हे आता आपणा सर्वांना माहित झाले आहेच!'

'गोठ्याजवळच्या लढाईत तो मोठ्या शौर्याने लढला होता.' कुणीतरी मध्येच हळू आवाजात म्हटले.

'केवळ शौर्य पुरेसे नाही!' स्क्वीलरने आपले भाषण पुढे सुरू केले, 'निष्ठा आणि आज्ञाधारकपणा हे त्यापेक्षा महत्त्वाचे गुण आहेत. गोठ्याजवळच्या लढाईसंबंधीच बोलायचे झाले तर मला असे वाटते की लौकरच अशा काही गोष्टी उघडकीस येतील की ज्यामुळे तुम्हाला असे दिसून येईल की स्नोबॉलने त्या लढाईत काही केलेच नव्हते. शिस्त पाहिजे! बंधूंनो, कडवी पोलादी शिस्त पाहिजे! शिस्त हा आपला आजपासून परवलीचा शब्द आहे. आपले एखादे जरी पाऊल चुकले तरी शत्रू आपल्या मानगुटीवर बसलाच म्हणून समजा. बंधुंनो, जोन्सने पुन्हा येऊन आपल्या उरावर बसावे असे तुम्हाला वाटते काय?'

हमखास निरुत्तर करणारा हा युक्तिवाद पुन्हा एकदा प्राण्यांपुढे आला. त्यामुळे त्यांनी विचार केला की जोन्सची कारकीर्द पुन्हा येणार असेल तर रविवारच्या सभा बंद केलेल्याच बऱ्या. बॉक्सरला आता विचार करायला अवधी मिळाला. तो म्हणाला, 'कॉम्रेड नेपोलियनचे असे म्हणणे असेल तर ते बरोबरच असले पाहिजे.' त्या दिवसापासून त्याने एक नवीनच ध्येयवाक्य बनवले. ते म्हणजे – 'नेपोलियने नेहमी बरोबर असते.' याशिवाय 'मी अधिक कष्ट करीन' हे जुने ब्रीदवाक्य त्याने उराशी बाळगले होतेच.

दरम्यानच्या काळात हवामानात बदल झाला होता. नांगरटीचे दिवस आले होते. ज्या शेडमध्ये स्नोबॉलने प्रयोगशाळा उघडली होती ती शेड बंद केली आहे असे प्राणी आपआपसात बोलू लागले. पुढील आठवड्यात कोणती कामे करावयाची याचे हुकूम घेण्यासाठी सारे प्राणी रविवारी सकाळी गोदामात जमत असतच.

फळबागेनजीक मेजरचे प्रेत पुरले होते. तिथून मेजरची कवटी काढून, ती साफसूफ

करून ध्वजस्तंभाशेजारी एका दांडक्यावर लावून ठेवण्यात आली – बंदुकीशेजारीच. आणखी एक नवी प्रथा सुरू करण्यात आली. ध्वज चढवल्यानंतर सर्व प्राण्यांनी मोठ्या गोदामात जाण्यापूर्वी या कवटीसमोरून परम आदराने संचलन करून मानवंदना द्यावी असे सांगण्यात आले.

आता प्राणी पूर्वीसारखे एकत्र बसत नव्हते. नेपोलियन, स्क्वीलर आणि मिनिमस हा डुकरांमधील शीघ्र कवी असे तिघे उंच व्यासपीठावर अग्रभागी बसत. या तिघांच्या भोवती नऊ कुत्री अर्धवर्तुळात बसत. त्याच्यामागे बाकीची डुकरे बसत. (अर्थात व्यासपीठावरच). बाकीचे सर्व प्राणी मात्र गोदामाच्या इतर भागात श्रोत्यांच्या स्थानी बसत. नेपोलियन नंतर कठोर आवाज नि लष्करी धर्तीवर पुढच्या आठवड्यात करावयाच्या कामाचे हुकूम वाचून दाखवी. त्यानंतर 'देशातील पशूंनो' हे गीत म्हटले जाई आणि सभा बरखास्त होईल.

स्नोबॉलच्या हकालपट्टीनंतर तिसऱ्या रविवारी एक नवलपूर्ण घटना घडली. त्यामुळे प्राण्यांना थोडे आश्चर्य वाटले. कारण त्या रविवारी नेपोलियनने घोषणा केली की, 'अखेर आपण पवनचक्की बांधणार!' आपले पूर्वीचे मत का बदलले यासंबंधी त्याने कसलेही कारण वा स्पष्टीकरण केले नाही. फक्त त्याने प्राण्यांना एवढाच इशारा दिला की, या हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी सर्वांना अतिशय परिश्रम घ्यावे लागणार आहेत. आवश्यकता पडल्यास अन्नधान्याचा कोटासुद्धा कमी करावा लागेल. त्यानंतर त्याने सांगितले की, पवनचक्कीची तपशीलवार योजना तयार करण्यात आली आहे. डुकरांची खास समिती या विषयाचा तब्बल तीन आठवडे अभ्यास करीत होती. पवनचक्की उभारण्यासाठी दोन वर्षे लागतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

त्यादिवशी संध्याकाळी स्क्वीलरने प्राण्यांच्या खासगी भेटी घेऊन काही स्पष्टीकरण केले. त्याने सांगितले, 'खरे सांगायचे तर पवनचक्कीच्या योजनेला नेपोलियनचा कधीच विरोध नव्हता. उलट त्यानेच तर सुरुवातीपासून ही योजना तयार करून तिचा पुरस्कार केला होता. स्नोबॉलने त्या शेडमध्ये केलेली योजना आणि काढलेले नकाशे हे सर्व नेपोलियनकडून त्याने चोरलेले होते. वस्तुतः पवनचक्कीच्या योजनेची मूळ कल्पना आणि निर्मिती नेपोलियनचीच होती.'

'असे होते तर नेपोलियनच या योजनेवर असा तुटून का पडला?' या प्रश्नाने स्क्वीलर थोडासा भांबावला. पण लगेच सावरून म्हणाला, 'यातच तर नेपोलियनचे चातुर्य आहे. पवनचक्कीच्या योजनेला नेपोलियन विरोध करीत आहे असे तुम्हा-आम्हाला वाटत होते. पण ते तसे नव्हते. कारण स्नोबॉलची हकालपट्टी करण्याची ती एक युक्ती होती. स्नोबॉलचा अडथळा दूर झाल्याने आता ही योजना सुरळीतपणे पार पडेल. हे जे काही झाले किंवा केले गेले याला 'डावपेच म्हणतात' असे स्क्वीलरने सांगितले, प्राण्यांना हा प्रकार नीटसा कळला नाही. पण स्क्वीलर वारंवार ओरडत होता, 'डावपेच' बंधूंनो डावपेच!' तरातरा इकडे तिकडे फिरत अन् जोराजोराने शेपटी हालवीत हसतमुखाने तो हे सांगत होता. तरी प्राण्यांना समजलेच नाही, पण स्क्वीलरचे भाषण इतके मोहक होते आणि त्याच्याबरोबर आलेली ती तीन कुत्री अशा भीतिदायक आवाजात गुरगुरत होती की आणखी काही प्रश्न, उपप्रश्न न करता त्यांनी स्क्वीलरचा खुलासा लगेच मान्य करून टाकला.

●

# आपण विचार स्वच्छ ठेवावा

## — शरद जोशी

आंबेठाण,
२४/१०/१९९५

शेतकरी संघटनेने समाजवादी व्यवस्थेविरुद्ध एका महत्त्वाच्या आंदोलनाला सुरुवात केली. समाजवादी व्यवस्था शेतीमालाच्या भावाबरोबर टिकूच शकत नाही हे लक्षात घेता, समाजवादाच्या व्यवस्थेस सर्वमान्यता असतांना त्याचा पाया उखडण्याचे काम शेतकरी आंदोलनाने केले. आता, त्यापुढील पायरी आली आहे. केवळ एक खांब उखडून किंवा कमकुवत करून भागणार नाही; सर्व इमारतच उखडायची आहे. त्यासाठी केवळ शेतकरी समाजाची ताकद पुरी पडेल असे दिसत नाही. शेतकऱ्यांतही सर्व शेतकरी या कामात लागतात असे नाही. प्रामाणिकपणे, सन्मानाने जगण्याची इच्छा बाळगणारे शेतकरी आपल्याकडे मोठ्या संख्येने आले. परंतु, सबसिडीच्या किंवा सत्तेच्या लालसेने अनेक शेतकरी राज्यकर्त्या पक्षाकडे, एवढेच नव्हे तर जातीयवाद्यांकडे गेले हेही खरे.

समाजवादी व्यवस्थेला विरोध करून खुली व्यवस्था आणण्याची इच्छा असणारे वर्ग समाजात कोणते? एक शेतकरी आणि दुसरा ग्राहक. या खेरीज आजमितीसतरी हिंदुस्थानात खुल्या व्यवस्थेचे पुरस्कर्ते मला कोणी दिसत नाही. या दोन्ही वर्गांना एकत्र आणण्याचे काम शेतकरी संघटना करू शकणार नाही. केवळ 'शेतकरी' नावाने उभी असलेली संघटना ग्राहकांच्या मनात शंका तयार करील. आणि केवळ राजकीय पक्षाचे नाव असलेली कोणतीही संघटना शेतकऱ्यांच्या मनांत शंका निर्माण करील. अशा काहीशा विचित्र परिस्थितीत आपण सापडलो आहोत.

सध्या सर्वचजण भांबावलेल्या अवस्थेत आहेत आणि नकळत विनाशाकडे जात आहेत. या परिस्थितीत आपण आपला विचार स्वच्छ ठेवावा. क्षणिक पराभवाने घाबरून जाऊ नये किंवा क्षणिक मोहासाठी कोणतीतरी तडजोड करायला तयार होऊ नये; यातच शेवटी संघटनेचे, आंदोलनाचे आणि देशाचे भले आहे असे मला वाटते.

(तराडखेड, पो. गुम्मी, ता. जि. बुलढाणा येथील डॉ. हसनराव देशमुख हे गेल्या विधानसभा निवडणुकीत उमेदवार होते. त्यांनी शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका, कार्यकर्त्यांचे वर्तन इत्यादिविषयी आपले विचार मांडणारे पत्र श्री. शरद जोशींना लिहिले. त्याला शरद जोशींनी पाठविलेल्या उत्तरातील काही भाग.)

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th November, 1995

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
November 6, 1995

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

संचालक व प्रशासक यांचा भ्रष्टाचार,
यंत्रसामुग्रीचा जुनाटपणा,
व्यवस्थापनातील अकार्यक्षमता आणि
शेतकऱ्यांविषयी कमाल मग्रूरीची
अनास्था यांमुळे ऊसउत्पादक
शेतकऱ्यांचे आणि त्यांच्या
कुटुंबांचे/गांवांचे पाचट करणाऱ्या
सहकारी साखर कारखान्यांविरुद्ध....

# हातोडा मोर्चा

**— ठिकाण —**
**अंबाजोगाई सह. साखर कारखाना लि.,**
**ता. अंबाजोगाई, जि. बीड.**
**१५ नोव्हेंबर १९९५ रोजी**
**दुपारी २ वाजता**

**महाराष्ट्रभरच्या सर्व शेतकरी मायबहिणींनी हाती हातोडा घेऊन या मोर्चात सामील व्हावे.**

# स्वातंत्र्य यात्रा

## १२ डिसेंबर १९९५

## हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन

पांढुर्णा येथे नांदेड व नागपूर येथून सुरू झालेल्या 'स्वातंत्र्य यात्रांचे' संगठन दुपारी १ वाजता होईल.

या यात्रांमध्ये शेतकऱ्यांनी प्रत्येकी एक पिशवी भरून कापूस बरोबर आणावा. दोन्ही स्वातंत्र्य यात्रा एकत्र आल्याबरोबर तेथे जमलेले लाखो शेतकरी आपल्याजवळील पिशवीभर कापूस पांढुर्णा येथून सीमापार करून मध्यप्रदेशात घेऊन जातील व तेथे त्याची विक्री करतील.

याच कार्यक्रमात, शेतकरी संघटनेच्या पुढील कार्यक्रमाचीही घोषणा होण्याची शक्यता आहे.

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.-०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक — मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.